# जिल्हा निवड समिती भंडारा

**जाहीरात क्रमांक - 4691/2025 दिनांक- 04/12/2025**

## कंत्राटी वैद्यकीय अधिकारी या पदाकरीता जाहीरात

जिल्हा परिषद भंडारा अंतर्गत येणाऱ्या जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्र येथील नियमीत वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे रुग्णांपर्यंत आरोग्य सेवा पुरविण्यास अडचन निर्माण होत आहे. त्यामुळे सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय क्र.मवैअ-1054/प्र.क्र.241/सेवा-3 दि.02 मार्च 2015 तथा मवैअ-1054/प्र.क्र.241/भाग 2/सेवा-3 दि.4 जुलै 2019 अन्वये MBBS व BAMS उमेदवारांची 11 महिने कालावधी करिता एकत्रीत मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात आरोग्य सेवा सांभाळण्या करिता नियुक्त करण्याबाबत निर्देशीत आहे. त्यानुसार जिल्हा परिषद भंडारा अंतर्गत येणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रामधील वैद्यकीय अधिकारी हे पद रिक्त असलेल्या तथा पुढे रिक्त होणाऱ्या नियमीत वैद्यकीय अधिकारी या पदांच्या ऐवजी नियुक्त करावयाचे असलेल्या कंत्राटी वैद्यकीय अधिकारी या पदाकरीता अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | वयोमर्यादा | शैक्षणिक अर्हता | मानधन |
|---|---|---|---|---|
| **1** | **कंत्राटी वैद्यकीय अधिकारी** | **अर्ज करणाऱ्या उमेदवाराचे वय 58 वर्षापेक्षा जास्त नसावे** | **MBBS** | **रु. 75,000/-** |
| | | | **BAMS** | **रु. 40,000/-** |
| टिप | ➢ उच्च शैक्षणिक पात्रतेचे उमेदवार उपलब्ध झाल्यास त्यांना प्राधाण्य देण्यात येईल.<br>➢ उमेदवारांची निवड त्यांच्या गुणवत्तेच्या आधारे करण्यात येईल.<br>➢ रिक्त पदांची संख्या व आरोग्य केंद्रांची माहिती समुपदेशनाच्या वेळी जाहीर करण्यात येईल. | | | |

**अर्ज सादर करावयाचा कालावधी**

- अर्ज सादर करावयाचा दिनांक **- जाहीरात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून**
- अर्ज सादर करावायाचा शेवटचा दिनांक व वेळ - **दिनांक- 13/12/2025 रोजी वेळ दुपारी-05.00 वाजेपर्यंत**

**अर्ज सादर करावयाची पद्धत**

उमेदवारांनी या सोबत दिलेल्या GOOGLE LINK वर जावून आपली संपुर्ण माहिती सादर करावयाची आहे. तसेच GOOGLE FORM परीपुर्ण भरुण SUBMIT केल्यानंतर भरलेला अर्ज उमेदवारांच्या ई-मेल वर प्राप्त होईल. सदर ईमेलवर प्राप्त अर्जाची प्रिंट घेवून त्यासोबत खालीलप्रमाणे दिलेले दस्ताऐवजांची स्वयं: साक्षांकीत प्रत जोडून खालीलप्रमाणे दिलेल्या पत्त्यावर डाकेने किंवा प्रत्यक्ष सादर करावयाची आहे.

**अर्जासोबत जोडावयाची दस्ताऐवज**

सदर दस्ताऐवजांचे खालीलप्रमाणे दिलेल्या क्रमानूसार एकत्रीत स्कॅन करुन PDF फाईल GOOGLE FORM मध्ये Upload करावी सदर फाईल चा साईज 10 MB पेक्षा जास्त नसावा. तसेच Upload केलेले दस्ताऐवज ईमेल वर प्राप्त अर्जा सोबत जोडून दिलेल्या पत्यावर डाकेने किंवा प्रत्यक्ष सादर करावे.

1) पदवी परीक्षेचे संपुर्ण वर्षाचे गुणपत्रक
2) उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र
3) MMC चे कायम नोंदणी प्रमाणपत्र
4) पदवी प्रमाणपत्र (असल्यास)
5) अनुभव प्रमाणपत्र (असल्यास शासकीय संस्थेतील अनुभव प्रमाणपत्र जोडावे)
6) उच्च शैक्षणिक अर्हतेबाबतचे गुणपत्रक/उत्तीर्ण प्रमाणपत्र (असल्यास)
7) आधार कार्ड
8) पॅन कार्ड

**अर्ज सादर करावयाची Link**

**https://forms.gle/c1oa9zZ7Un2kPEWZA**

**अर्ज सादर करावयाचा पत्ता-**

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद भंडारा,
प्रशासकीय ईमारत, राष्ट्रीय महामार्ग क्र. 53,
भंडारा महाराष्ट्र-441904

**अटी व शर्ती:-**

1) कंत्राटी वैद्यकीय अधिकारी हे शासकीय नियमीत कर्मचाऱ्यामध्ये कोणतेही फायदे मिळण्यास पात्र असणार नाहीत.
2) कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा समाधानकारक नसल्यास कोणत्याही क्षणी त्यांची कंत्राटी सेवा पुर्व सुचना न देता समाप्त करता येईल.
3) ज्या प्राथमिक आरोग्य केंद्र रिक्त ठीकाणी एम.बी.बी.एस अर्हताधारक उपलब्ध होणार नाहीत, त्याठीकाणी बी.ए.एम.एस अर्हताधारकांना नियुक्ती देण्यात येईल.
4) निवड झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी नियुक्तीच्या ठिकाणी मुख्यालयी राहणे बंधनकारक असेल.
5) निवड झालेल्या वैद्यकीय अधिकारी यांनी 1 महिन्यांची आगाऊ सुचना जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांना देऊन कार्यमुक्त होऊ शकतील.
6) खालील कारणास्तव कार्यमुक्त झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना पुन्हा नियुक्ती मिळणार नाही.
   - ❖ कंत्राटी म्हणुन नियुक्ती मिळाल्यानंतर कालावधी पुर्ण होण्यापुर्वी परवानगी न घेता गैरहजर असलेले व सोडुन गेलेले वैद्यकीय अधिकारी.
   - ❖ शासन सेवेत 58 वर्ष सेवा पुर्ण करुन सेवानिवृत्त झालेले वैद्यकीय अधिकारी.
   - ❖ शिस्तभंगाच्या कारणास्तव सेवा समाप्त केलेले वैद्यकीय अधिकारी.
   - ❖ अनाधीकृत गैरहजर असलेले व शासन सेवेतुन काढुन टाकलेले व संपामध्ये भाग घेतलेले वैद्यकीय अधिकारी.
7) नियमीत वैद्यकीय अधिकारी उपलब्ध झाल्यानंतर कंत्राटी पध्दतीवर नियुक्ती केलेल्या वैद्यकिय अधिकाऱ्यांची सेवा समाप्त करतांना जो वैद्यकीय अधीकारी शेवटी रुजु झालेले आहे त्यांची सेवा प्रथम समाप्त करण्यात येईल व इतर ठीकाणी रिक्त पद असल्यास त्या ठिकाणी नियुक्ती देणेबाबत प्राधान्य दिले जाईल.
8) वैद्यकीय अधिकाऱ्याकडुन त्यांची नियुक्ती कंत्राटी स्वरुपाची असल्यामुळे सदर पदावर कायम करण्याबाबत भविष्यात अधिकार सांगणार नाही व त्यासाठी तसेच इतर अन्य मागण्यासाठी आंदोलन/ संप / बंद / इत्यादी करणार नाही .व त्यात भाग घेणार नाही. अश्या आशयाचे बंधपत्र 100/- रूपयांच्या स्टॅम्पपेपर वर घेण्यात यावे.
9) या सेवा कंत्राटी पध्दतीने असल्याने त्याबाबत कोणताही न्यायालयात जाता येणार नाही.
10) शासन सेवा शर्ती खाली ही सेवा नसल्याने त्या अनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन, विमा योजना, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत.
11) प्रस्तुत अटी व शर्ती मध्ये वेळोवेळी बदल करण्याचे अधिकारी समितीकडे राखीव राहतील.

**सचिव**
**जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद भंडारा**

**अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हाधिकारी, भंडारा**